# कला व आर्किटेक्चर अंतरविद्यालय केंद्र शुरू



संवाददाता

**पुणे.** वरिष्ठ तबला वादक पं. तलवलकर और महाराष्ट्र कला संचालनालय के संचालक आर्किटेक्ट राजीव मिश्रा के हाथों महर्षि कर्वे स्त्री शिक्षा संस्था के कला व आर्किटेक्चर अंतरविद्याशाखीय केंद्र का हाल ही में उद्घाटन हुआ. इस दौरान वरिष्ठ गायिका आरती अंकलीकर-टिकेकर, बीएनसीए के प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप, शिक्षण विभाग प्रमुख डॉ. शुभदा कमलापुरकर, अंतरविद्याशाखीय केंद्र प्रमुख डॉ. संजीवनी पेंडसे, इसके साथ डॉ. वसुधा गोखले आदि उपस्थित थे. पं.सुरेश तलवलकर ने कहा कि भारतीय कला के साथ संगीत के शास्त्र, तंत्र, विद्या और कला यह अंग वास्तु रचनाशास्त्र में (आर्किटेक्चर) आते हैं. इनमें अमूर्त से मूर्त की ओर जाने वाला भारतीय बंदिश का सफर वास्तुरचना शास्त्र से जुड़ा है. उनमें आकृतिबंध राग का मापदंड और आकारमान से संबंधित है.

## राजीव मिश्रा के हाथों हुआ उद्घाटन

संगीत की निर्मिति वास्तु रचना के आकृतिबंध जैसी होती है. पं. तलवलकर ने कहा कि संगीत का परिणाम सुप्त मन तक जाने के कारण दर्जेदार वास्तु की निर्मिति की अभिव्यक्ति किसी अच्छे रागदारी जैसी हो जाती है. डॉ. कश्यप ने कहा कि कला और आर्किटेक्चर के मूलभूत तत्व एक समान हैं, जिसमें त्यात नाद (संगीत), ताल व आकृतिबंध का समावेश होता है. उन्होंने बताया कि इन कलाओं की अभिव्यक्ति ध्वनि, कागज और आर्किटेक्चर में रेत, सीमेंट व ईंट के माध्यम से साकार होती दिखाई देती है. इस बात को ध्यान में रखकर देश में ऐसा पहला अंतरविद्याशाखीय संशोधन केंद्र बीएनसीए में शुरू हो रहा है.

इन कलाओं से होनेवाला संबंध अबाधित रखते हुए वह अभ्यास व संशोधन के रूप में वृद्धिंगत होगा, ऐसा विश्वास उन्होंने व्यक्त किया. दो दिन के इस परिसंवाद में वास्तु रचनाशास्त्र और नृत्य पर अभ्यासपूर्ण भाष्य करते हुए शर्वरी जमेनीस ने उनके सहयोगियों के साथ विविध नृत्य प्रकारों का नेत्रदीपक प्रस्तुतिकरण किया.उन्होंने नृत्य व वास्तुरचना की अवकाश निर्मिर्ति व नृत्यरचनाओं का संबंध विस्तारीत रूप से विषद करते हुए दोनों की मर्यादा, उनका पोत व अभिव्यक्ति के साथ आविष्करण के विविध प्रकार का साम्य विस्तार से पेश किया.



# भारतीय संगीतातली मूलभूत अंगे वास्तूरचनेशीही निगडीत

## पं.सुरेश तळवलकर यांचे प्रतिपादन

**पुणे** : भारतीय कला तसेच संगीतातली शास्त्र, तंत्र, विद्या आणि कलाही अंग वास्तूरचना शास्त्रामध्येही येतात. यात अमूर्ताकडून मूर्ताकडे होत जाणारा भारतीय बंदिशीतला प्रवास वास्तूरचना शास्त्राशी जवळीक साधणारा आहे. त्यातील आकृतीबंध हा रागाचे मापदंड आणि आकारमानाशी संबंधित असून संगीताची निर्मिती ही वास्तुरचनेतील आकृतीबंधासारखी असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ तबलावादक पं. सुरेश तळवळकर यांनी व्यक्त केले.



पं. तळवलकर आणि महाराष्ट्र कला संचालनालयाचे संचालक आर्किटेक्ट राजीव मिश्रा यांच्या हस्ते महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील कला व आर्किटेक्चर या आंतरविद्याशाखीय केंद्राचे नुकतेच उद्घाटन झाले. त्यावेळी तळवळकर बोलत होते. यावेळी ज्येष्ठ गायिका आरती अंकलीकर-टिकेकर, बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप, शिक्षण विभागप्रमुख डॉ. शुभदा कमलापूरकर, आंतरविद्याशाखीय केंद्राच्या प्रमुख डॉ. संजिवनी पेंडसे, डॉ. वसुधा गोखले आदी उपस्थित होते. पं. तळवलकर पुढे म्हणाले की, संगीताचा परिणाम हा सूप्त मनापर्यंत गेला असल्यामुळे दर्जेदार वास्तूच्या निर्मितीची अभिव्यक्ती ही एखाद्या कसदार रागदारीसारखी होत जाते.

## आंतरविद्याशाखीय संशोधन केंद्र बीएनसीएमध्ये सुरू

डॉ. कश्यप म्हणाले की, आर्किटेक्चरची मूलभूत तत्त्वे समान असून त्यात नाद (संगीत), ताल व आकृतीबंध यांचा समावेश होतो. या कलांची अभिव्यक्ती ही ध्वनी, कागद तर आर्किटेक्चरमध्ये वाळू, सिमेंट व विटा यांच्या माध्यमातून साकार होताना दिसतात. हे लक्षात घेऊन देशातले असे पहिले आंतरविद्याशाखीय संशोधन केंद्र बीएनसीएमध्ये सुरू होत आहे. त्याचे सर्व कलांशी असणारे नाते अबाधित ठेवताना ते अभ्यास व संशोधनाच्या रूपातून वृद्धिंगत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आरती अंकलीकर-टिकेकर म्हणाल्या,राग सादर करणाऱ्या कलाकाराची तुलना विहंगावलोकनातून प्रत्ययाला येणाऱ्या एखाद्या सर्वांगसुंदर वास्तूसारखी असते. ज्यामध्ये त्या इमारतीतला प्रत्येक मजला हा सर्जनशीलतेच्या स्वर विचारांप्रमाणे काल व अवकाशाशी बांधला जातो; तर रागातील विलंबित ख्याात हा या इमारतीमागच्या विचारांचा भक्कम पाया म्हणून काम करत असल्याचे प्रतित होते. सांगितीक विचारांचे हे भौतिक प्रकटीकरण वास्तूरचना करताना होत असते. राजीव मिश्रा म्हणाले की, कला आणि आर्किटेक्चर यांचे नाते एकमेकांना पूरक असते. यातूनच संगीत, नृत्यकला या ओघानेच वास्तूरचनेशी जोडल्या जाताना दिसतात.

## मुंबईप्रमाणे पुण्यातही कला समितीची गरज

तसेच त्यांचे सादरीकरण ही ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या वास्तूंपुढे संगीत व कला विविध महोत्सवांच्या माध्यमातून होताना दिसते. वास्तूरचनेचा सर्व कलांशी असणारा अन्योन्य संबंध लक्षात घेता आज दिल्ली व मुंबईप्रमाणे पुण्यातही अशा कला समितीची गरज आहे. यातून शहराची कलात्मक अभिरुची मूर्त स्वरूपात येतानाही कला समिती शहराच्या विविध जागांचा सांस्कृतिक कारणासाठी धोरणात्मक वापर करण्यास हातभार लावील.

# भारतीय संगीतातली मूलभूत अंगे वास्तूरचनेशीही निगडीत : पं. तळवळकर

पुणे, दि. २९ - भारतीय कला तसेच संगीतातली शास्त्र, तंत्र, विद्या आणि कलाही अंग वास्तूरचनाशास्त्रामध्येही (आर्किटेक्चर) येतात. यात अमूर्ताकडून मूर्ताकडे होत जाणारा भारतीय बंदिशीतला प्रवास वास्तूरचना शास्त्राशी जवळीक साधणारा आहे. त्यातील आकृतीबंध हा रागाचे मापदंड आणि आकारमानाशी संबंधित असून संगीताची निर्मिती ही वास्तुरचनेतील आकृतीबंधासारखी असते, असे निरीक्षण ज्येष्ठ तबलावादक पं. सुरेश तळवळकर यांनी नोंदवले.

महाराष्ट्र कला संचालनालयाचे संचालक आर्किटेक्ट राजीव मिश्रा यांच्या हस्ते महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील कला व आर्किटेक्चर या आंतरविद्याशाखीय केंद्राचे नुकतेच उद्घाटन झाले. त्यावेळी तळवळकर बोलत होते. यावेळी ज्येष्ठ गायिका आरती अंकलीकर-टिकेकर, बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप, शिक्षण विभागप्रमुख डॉ. शुभदा कमलापूरकर, आंतरविद्याशाखीय केंद्राच्या प्रमुख डॉ. संजिवनी पेंडसे, तसेच डॉ. वसुधा गोखले आदी उपस्थित होते.

तळवळकर म्हणाले, संगीताचा परिणाम हा सुप्त मनापर्यंत गेला असल्यामुळे दर्जेदार वास्तूच्या निर्मितीची अभिव्यक्ती ही एखाद्या कसदार रागदारीसारखी होत जाते. आपल्या प्रास्ताविकात डॉ. कश्यप यांनी कला व आर्किटेक्चरची मूलभूत तत्त्वे समान असून त्यात नाद (संगीत), ताल व आकृतीबंध यांचा समावेश होतो, असे सांगितले. डॉ. सुषमा जोगळेकरांनी ओरिगामी हस्तकलेद्वारे भूमिती आणि वास्तूरचना यांचे नाते उलगडून दाखवले.

# वास्तूरचनेशीही भारतीय संगीतातली मूलभूत अंगे निगडीत : पं. तळवळकर

## बीएनसीएतील कला व आर्किटेक्चर केंद्राचे उद्घाटनप्रसंगी

पुणे : प्रतिनिधी

भारतीय कला तसेच संगीतातली शास्त्र, तंत्र, विद्या आणि कलाही अंग वास्तूरचनाशास्त्रामध्येही (आर्किटेक्चर) येतात. यात अमूर्ताकडून मूर्ताकडे होत जाणारा भारतीय बंदिशीतला प्रवास वास्तूरचना शास्त्राशी जवळीक साधणारा आहे. त्यातील आकृतीबंध हा रागाचे मापदंड आणि आकारमानाशी संबंधित असून, संगीताची निर्मिती ही वास्तूरचनेतील आकृतीबंधासारखी असते, असे निरिक्षण ज्येष्ठ तबलावादक पं. सुरेश तळवळकर यांनी नोंदवले.

पं. तळवळकर आणि महाराष्ट्र कला संचालनालयाचे संचालक आर्किटेक्ट राजीव मिश्रा यांच्या हस्ते महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर विमेन (बीएनसीए) येथील कला व आर्किटेक्चर या आंतरविद्याशाखीय केंद्राचे नुकतेच उद्घाटन झाले. त्यावेळी तळवळकर बोलत होते. यावेळी गायिका आरती अंकलीकर-टिकेकर, बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप, शिक्षण विभागप्रमुख डॉ.शुभदा कमलापूरकर, आंतरविद्याशाखीय केंद्राच्या प्रमुख डॉ.संजीवनी पेंडसे आदी मान्यवर उपस्थित होते.

तळवळकर म्हणाले, संगीताचा परिणाम हा सूप्त मनापर्यंत गेला असल्यामुळे दर्जेदार वास्तूच्या निर्मितीची अभिव्यक्ती ही एखाद्या कसदार रागदारीसारखी होत जाते. आपल्या प्रास्तविकात डॉ. कश्यप यांनी कला व आर्किटेक्चरची मूलभूत तत्त्वे समान असून, त्यात नाद (संगीत), ताल व आकृतीबंध यांचा समावेश होतो, असे सांगितले. ते म्हणाले की, या कलांची अभिव्यक्ती हीं ध्वनी, कागद तर आर्किटेक्चरमध्ये वाळू, सिमेंट व विटा यांच्या माध्यमातून साकार होताना दिसतात. हे लक्षात घेऊन देशातले असे पहिले आंतरविद्याशाखीय संशोधन केंद्र बीएनसीएमध्ये सुरू होत आहे. त्याचे सर्व कलांशी असणारे नाते अबाधित ठेवताना ते अभ्यास व संशोधनाच्या रूपातून वृद्धिंगत होईल.

राज्याच्या कला संचालनालयाचे संचालक आर्किटेक्ट राजीव मिश्रा यांनी संगीत, कला आणि आर्किटेक्चर यांचे नाते एकमेकांना पूरक असते, असे सांगितले. ते म्हणाले की, यातूनच संगीत, नृत्यकला या ओघानेच वास्तूरचनेशी जोडल्या जाताना दिसतात. तसेच त्यांचे सादरीकरण ही ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या वास्तूंपुढे संगीत व कला विविध महोत्सवांच्या माध्यमातून होताना दिसते. वास्तूरचनेचा सर्व कलांशी असणारा संबंध लक्षात घेता दिल्ली व मुंबईप्रमाणे पुण्यातही अशा कला समितीची गरज आहे. यातून शहराची कलात्मक अभिरुची मूर्त स्वरूपात येतानाही कला समिती शहराच्या विविध जागांचा सांस्कृतिक कारणासाठी धोरणात्मक वापर करण्यास हातभार लावील.